नियमीत फौ. ख.क्र. ९१/२०११
सरकार विरुध्द परशुराम वगैरे
निशाणी क्र. १५२

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (१२) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– नवनाथ अशोक महालकर,
वय सुमारेः– ४२ वर्ष, व्यवसायः– सुवर्ण कारागिर,
निवासस्थानः– रांजणगाव देशमुख, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर.

## सर तपासणी

## अभियोग पक्षाकरिता श्री. ए. बी. विधाटे सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

फिर्यादी मुकूंद हे माझे मेहुणे आहेत. मी आरोपी क्र.१ याला ओळखतो. घटना एप्रिल २००८ मध्ये घडली होती. आरोपी क्र.१ याने फिर्यादीला तुमच्या घरामध्ये सोने आहे, मी तुम्हाला काढुन देतो त्याकरीता आरोपीने फिर्यादीकडे चाळीस लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर माझे मेहुणे फिर्यादी यांनी आरोपी क्र.१ याला ऐवढे पैसे देणे होणार नाही असे सांगितले व सदरचा व्यवहार ३० लाखांत ठरला. त्यानंतर फिर्यादी यांनी बँकेत सोने गहाण ठेवुन दिड लाख रुपये आरोपी क्र.१ याला दिले. त्यानंतर माझे मेहुणे आरोपी क्र.१ याच्याकडे करमाळा येथे गेले. त्यानंतर मला फिर्यादीने सांगितले की, आरोपींनी मला सोन्याचे चार ते पाच नाणे काढुन दिले. या व्यतिरीक्त काय घडले हे मला घटना खुप दिवस झाल्याने आठवत नाही. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली नव्हती.

**सरतपास पुर्ण.**

## उलट तपासणी आरोपी क्र.२, ३ व ४ करिता श्री. जे. टी. बट्टुळे वकील

२. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी सांगेल तसे मी या केसबाबत ऐकत आलो आहे.

...उलटतपास पुर्ण.

... फेर तपास ... काही नाही. श्रवणोत्तर स्वीकृत.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.04.02 17:22:53 +0530

दिनांकः ०२.०४.२०२६

(**रविकिरण सपाटे**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पाथर्डी जि. अहमदनगर.